ePaper

## मांसविक्री बंदीचा निर्णय काँग्रेसचाच, राज्य सरकारची भूमिका समोर!

| वर्ष - 8 | अंक - 365 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार , दि. 13 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आतील पानांत

- गुकेश संयुक्त तिसऱ्या स्थानी!
- जान्हवी कपूरचा रॅम्पवॉक
- एअर इंडिया'ने भंग केल्याचा आरोप!
- शेतकऱ्यांसाठी सारे पक्ष एकसारखेच!

**भारतासाठी मोठी खुशखबर :** 'टॅरिफ' लवकरच होणार कमी ? : भारताच्या कूटनीतीला मोठे यश !

# मोदींचा अचूक नेम, ट्रम्प यांचा गेम!

## दि. १५ ऑगस्टला ट्रम्प - पुतिन यांची भेट : रशिया-युक्रेन युद्धावर चर्चा होणार !



| नवी दिल्ली / न्यूयॉर्क / मॉस्को | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अफलातून कूटनीतीला मोठे यश आले असून भारतावर लादला गेलेला 'टॅरिफ' लवकरच कमी होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींच्या डावपेचांपुढे सपशेल हाराकिरी पत्करली आहे**

.केली आणि आता दि. १५ ऑगस्ट रोजी रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन आणि ट्रम्प यांच्यामध्ये चर्चा होणार असल्याचे सकारात्मक पाऊल पडले आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्धाबाबत यावेळी सविस्तर चर्चा होईल असेही सांगण्यात येते.

**प्रदीर्घ युद्ध थांबण्याची शक्यता..**

अवघ्या विश्वातील सर्वात बलाढ्य देशांच्या या दोन्ही सर्वोच्च नेत्यांची ही बैठक असल्याने लवकरच रशिया - युक्रेन यांच्यातील युद्ध थांबू शकते, असे अनेक संरक्षणतज्ज्ञांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे, ही शक्यता सत्यात उतरली तर भारतालाही त्याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

**नेमक्या काय हालचाली होणार?**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या वस्तूंवर तब्बल ५० टक्के आयातशुल्क म्हणजेच टॅरिफ लावले आहे. अमेरिकेच्या या एका निर्णयाचा भारतीय व्यापाराला फटका बसत आहे. वस्त्रोद्योग, मत्स्योद्योग तसेच इतरही क्षेत्राला झळ बसताना दिसत आहे. यावरून मार्ग काढण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी देखील कूटनीती वापरली असून अमेरिकेला अडचणीचे ठरतील असे निर्णय घेतले आहेत, त्यामुळे ट्रम्प हे चांगलेच नरमले आहेत.

**अमेरिकेचा भारतावर आक्षेप..**

भारताच्या रशियासोबतच्या तेल व्यापारावर अमेरिकेने जोरदार आक्षेप घेतलेला आहे. दरम्यान, भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ थोपवल्यानंतर आता येत्या दि. १५ ऑगस्ट रोजी डोनाल्ड ट्रम्प आणि पुतिन यांची अत्यंत महत्त्वपूर्ण अशी एक बैठक होणार आहे. या बैठकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष

### भारताच्या हालचालींमुळे अमेरिका हादरली !

जागतिक व्यापारासह भारताला प्रत्येक गोष्टीत कमी लेखणाऱ्या अमेरिकेला नरेंद्र मोदी यांनी चांगलेच हादरवून टाकले. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी रशियाच्या अध्यक्षांशी अत्यंत गोपनीय चर्चा केली. त्याचप्रमाणे, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी चीनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि चर्चा केली. नरेंद्र मोदी हे देखील चीनच्या दौऱ्यावर जाणार असून ते चीनच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर अनेक मुद्द्यांवर बोलणार आहेत. थोडक्यात, भारत, रशिया आणि चीन हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेची दादागिरी बंद होईल, असे करार होणार आहेत. या अनाकलनीय हालचालींमुळे अमेरिका मात्र चांगलीच हादरून गेली आहे.

लागले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये रशिया-युक्रेन युद्धावर तोडगा काढण्यासंदर्भात चर्चा केली जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आणि याच बैठकीमुळे भारताला एक मोठी 'गुड न्यूज' मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**भारताला होणार मोठा फायदा !**

विदेश मंत्रालयाच्या सूत्रानुसार मिळालेल्या माहितीनुसार ट्रम्प आणि पुतिन यांची भेट निश्चित झाली असून ती नक्की होणार आहे. या भेटीत रशिया - युक्रेन या दोन्ही देशांदरम्यान चालू असलेल्या युद्धावर चर्चा होणार आहे. त्यामुळेलवकरच रशिया - युक्रेन यांच्यातील युद्ध थांबू शकते, असे म्हटले जात आहे. या भेटीमागे आणि चर्चेमागे भारताचा मोठा हात आहे. त्यामुळे, विशेष म्हणजे, ही शक्यता सत्यात उतरली तर भारतालाही त्याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे आणि हा फायदा म्हणजे भारतावरील टॅरिफ घटण्याची शक्यता आहे.

**जागतिक विश्लेषक काय म्हणतात?**

याबाबत, अमेरिकेतील दक्षिण आशियातील जागतिक राजकारणाचे विश्लेषक मायकल गुकेलमॅन यांनी मत व्यक्त केले आहे. ट्रम्प आणि पुतिन यांच्या भेटीमुळे भारताची जाचक टॅरिफमधून सुटका होऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे. भारताने केलेल्या मध्यस्थीमुळे अमेरिका जाम खूश झाली आहे आणि भारतापुढे फक्त आनंदाने लोटांगण घ्यायचे बाकी आहे, असे ते म्हणाले.

**भारताची सुटका कशी होऊ शकते?**

त्यांनी सांगितल्यानुसार, ट्रम्प आणि पुतिन यांची भेट ही भारतासाठी फार महत्त्वाची आहे. कारण, या बैठकीचा आणि भारतावर लादण्यात आलेल्या 'टॅरिफ' चा महत्त्वाचा संबंध आहे. त्यामुळेच ट्रम्प आणि पुतिन यांच्यात सकारात्मक चर्चा झाली तर भारताला टॅरिफमध्ये सूट मिळू शकते, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच या बैठकीत रशियाने युद्धविरामास सहमती दर्शवल्यास भारतावरील टॅरिफच्या माध्यमातून टाकण्यात आलेला दबावही कमी होऊ शकतो, असेही मायकल यांचे म्हणणे आहे.

**ट्रम्प चांगलेच नरमले..**

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ वाढवताना भारत आणि रशिया यांच्यातील तेल व्यापाराचा हवाला दिला होता. भारत रशियाकडून तेलाची आयात करतो. तसेच भारत हे तेल दुसऱ्यांनाही विकतो, असा दावा करत ट्रम्प यांनी भारतावरील टॅरिफ वाढवला होता. भारत आणि रशिया यांच्यातील व्यापारावर प्रभाव पडावा, म्हणून ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला होता. मात्र, रशियाने युक्रेनसोबतच्या युद्धातून माघार घेतल्यानंतर अमेरिकेला रशियावर तसेच रशियासोबत व्यापार करणाऱ्या राष्ट्रांवर दबाव टाकण्याची गरज भासणार नाही. त्यामुळेच ट्रम्प भारतावरील टॅरिफ कमी करू शकतात, असा तर्क लावला जात आहे. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

ePaper

मांसविक्री बंदीचा निर्णय काँग्रेसचाच, राज्य सरकारची भूमिका समोर!

| वर्ष - 8 | अंक - 365 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- गुकेश संयुक्त तिसऱ्या स्थानी!
- जान्हवी कपूरचा रॅम्पवॉक
- एअर इंडिया'ने भंग केल्याचा आरोप!
- शेतकऱ्यांसाठी सारे पक्ष एकसारखेच!

www.mahaenews.com | बुधवार , दि. 13 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

अरबी समुद्रात लष्करी हालचाली वाढल्या

भारत-पाकचा मोठा निर्णय : काहीतरी भयंकर घडत आहे ?

# भारत-पाक दरम्यान पुन्हा तणाव!

## सध्या युद्धविराम : 'ऑपरेशन सिंदूर' थांबले नसल्याचा भारताचा दावा, 'नेव्हिगेशन एरिया वॉर्निंग !

| मुंबई / इस्लामाबाद |
प्रतिनिधी | महाईन्यूज



**भारत-पाकिस्तान दरम्यान सर्वकाही व्यवस्थित नसल्याचा प्रत्यय येत आहे. 'ऑपरेशन सिंदूर' थांबले नसल्याचा दावा भारताने केला असून अरबी समुद्रामध्ये मोठ्या प्रमाणावर लष्करी हालचाली वाढीस लागल्या आहेत. अरबी समुद्रात प्रचंड तणाव असून काहीतरी मोठे घडणार असल्याचे संकेत लष्कराकडून देण्यात येत आहेत.**

### शस्त्रसंधी झाली, वस्तुस्थिती काय ?

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाल्याची घोषणा करण्यात आली. दरम्यान, दोन्ही देशांतील हे युद्ध सध्या थांबवलेले असले तरी भारताने मात्र 'ऑपरेशन सिंदूर' रद्द केलेले नाही. सध्या ही मोहीम फक्त स्थगित करण्यात आलेली आहे. अधून मधून पाकिस्तानकडून आगळीक होत असून त्यांना ठेचण्यासाठी लष्कर सज्ज ठेवण्यात आले आहे. त्यामुळे तणाव चांगलाच वाढला आहे.

### समुद्रात लष्कराच्या कवायती..

एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव कायम असताना अरबी सागरात मोठ्या हालचाली आणि कवायती वाढल्या आहेत. नुकत्याच झालेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धाचा संपूर्ण जगाने धसका घेतली होती. पहलगामवरील हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर पाकिस्ताननेही प्रत्युत्तरादाखल भारतावर जोरदार हल्ले केले होते. दोन्ही देशांतील युद्दसदृश स्थिती लक्षात घेता, भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाल्याची घोषणा करण्यात आली होती. सध्या मात्र, भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश एकाच वेळी युद्धाभ्यास करत आहेत.

### समुद्रात नेमके काय घडत आहे?

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना प्रदीर्घ असा समुद्रकिनारा लाभलेला आहे. त्यामुळे आपल्यावर समुद्रातूनही हल्ला होऊ शकतो, याची दोन्ही देशांना कल्पना आहे. भारताने तर पाकिस्तानला रोखण्यासाठी अरबी समुद्रावर नजर ठेवण्यासाठी नौसेनेला मोठे बळ पुरवलेले आहे. असे असतानाच आता पाकिस्तान आणि भारत या दोन्ही देशांनी 'फायरिंग ड्रिल' ची तयारी केली आहे. त्यामुळेच आता समुद्रातील हलचाली वाढल्या असल्याचे बोलले जात आहे.

### नेव्हिगेशन एरिया वॉर्निंग...

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी 'नेव्हिगेशन एरिया वॉर्निंग' जारी केलेली आहे. त्यामुळे या दोन्ही देशांकडून स्वतंत्रपणए फायरिंग ड्रिल केली जाणार आहे. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### पाकने काय इशारा दिला ?

पाकिस्तानच्या वॉर्निंगनुसार येत्या दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ४ ते दि. १२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ४ वाजेपर्यंत मरीन ट्रॅफिकला युद्धाभ्यास क्षेत्रापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. पाकिस्तानतर्फे एक तर भारताकडून अशा तीन वॉर्निंग देण्यात आल्या आहेत.

### भारताची फायरिंग ड्रिल कधी ?

भारताने दिलेल्या वॉर्निंगमध्ये ओखा, पोरबंदर, मोरमुगाओ या भागातील मरीन ट्रॅफिकला खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे. ओखा किनाऱ्यासाठी जारी करण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार भारताचे नौदल दि. ११ ऑगस्टरोजी ११.३० ते १.३० वाजेपर्यंत, पोरबंदर समुद्र किनाऱ्यावर जारी करण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार दि. १२ ऑगस्ट रोजी रात्री १२.३० वाजेपासून ते संध्याकाळी ६.३० वाजेपर्यंत तसेच मोरमुगाओ किनाऱ्यावर जारी करण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार दि.१३ ऑगस्ट रोजी दीड वाजेपासून ते संध्याकाळच्या सहा वाजेपर्यंत 'फायरिंग ड्रिल' केली जाईल. त्यामुळे या काळात सर्वच मरीन ट्रॅफिकला या भागापासून दूर राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## पाकिस्तानने मारली पायावर कुऱ्हाड !

पाकिस्तानने भारतासाठी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले होते. दरम्यान, आता पाकिस्तानने भारताविरोधात घेतलेला हा निर्णय त्यांच्याच अंगलट आला आहे. त्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जलवाटप करार स्थगित केला. तसेच, पाकिस्तानी जहाजांना भारतीय बंदरांवर येण्यास मज्जाव केला. या घटनेला आता बरेच दिवस झालेत. पाकिस्तानने त्यांचे हवाई क्षेत्र भारतासाठी बंद केल्यामुळे रोज शंभरपेक्षा जास्त विमानोड्डाण प्रभावित झाले. त्यामुळे ४.१० अब्ज पाकिस्तानी रुपयांचे (साधारण १२७कोटी भारतीय रुपये) नुकसान झाले आहे. इतर अनेक बाबतीत ही पाकिस्तानचे प्रचंड नुकसान झाले आहे, त्यांना आता पश्चाताप होत आहे.

### 'ही' वॉर्निंग म्हणजे नेमकं काय ?

'नेव्हिगेशन एरिया वॉर्निंग' ही संबंधित भागातून जाणारे व्यापारी जहाज, प्रवासी जहाज यांच्यासाठी देण्यात येते. समोर धोका आहे, असा त्याचा अर्थ आहे. या वॉर्निंग दिल्यानंतर कोणत्याही जहाजाने किंवा आकाशातून विमानानेही 'फायरिंग ड्रिल' च्या संबंधित भागातून जाऊ नये, असे सूचित केले जाते. पहलगामवर हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानने गडबडीत अशाच प्रकारची वॉर्निंग जारी केली होती. भारत समुद्रमार्गे आपल्यावर हल्ला करू शकतो, या भीतीपोटी ही वॉर्निंग जारी करण्यात आली होती. दरम्यान, आता भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश एकमेकांच्या सागरी हद्दीत 'फायरिंग ड्रिल' करत आहेत. त्यामुळे तणावात चांगलीच वाढ झाली आहे.

**पालिकेचा निर्णय**

## शहातील थांब्यांचे पथ विभागाकडून सर्वेक्षण

# बस थांबे उभारणाऱ्या ठेकेदाराला दंड!

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या विविध विभागांची परवानगी न घेता पुणे महानगर परिवहन महामंडळाची (पीएमपी) बसस्थानके उभारणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून, त्याच्याकडून तिप्पट दंड वसूल केला जाणार आहे. संबंधित ठेकेदाराकडून उभारण्यात येणाऱ्या बस थांब्यांचे काम थांबविण्यात आले असून शहरात किती ठिकाणी बस थांबे उभारण्यात आली आहेत, त्याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

## सक्षम नेतृत्व काँग्रेसची जमेची बाजू



महापालिकेचा पथ विभाग हे सर्वेक्षण करणार असल्याचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले. पुणे शहरासह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत बस थांबे उभारण्यासाठी पीएमपीने निविदा प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार एका ठेकेदाराला हे काम देण्यात आले होते.बस थांबे उभारताना संबधित ठेकेदाराला महापालिकेच्या पथ विभागासह विद्युत तसेच इतर कोणत्याही विभागाची परवानगी न घेता परस्पर रस्ते खोदून बस थांबे उभारल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेत त्यांना ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत निवेदन दिले होते.याबाबत महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, 'संबधित ठेकेदाराने पथ विभागाची कोणतीही परवानगी न घेता रस्ते खोदाई केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्याच्याकडून तिप्पट दंड वसूल केला जाणार आहे. तसेच शहरातील ज्या भागात ठेकेदाराने बस थांबे उभारताना महापालिकेकडून परवानगी घेतली नाही, त्याची शहानिशा करण्यासाठी सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. त्याचा अहवाल महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे सादर केला जाईल, त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.'पीएमपी आणि बस थांबे उभारणाऱ्या ठेकेदार कंपनीमध्ये करार झाला होता. या करारानुसार या ठेकेदाराने बस थांबे उभे करण्यासाठी महापालिकेच्या पथ विभाग, आकाशचिन्ह विभाग तसेच इतर विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक होते. त्यासाठी होणाऱ्या खोदाईचे शुल्क संबंधित विभागांकडे भरणे गरजेचे होते. मात्र, या कंपनीने महापालिकेच्या

## ठेकेदार कंपनीमध्ये करार

त्याचा अहवाल महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे सादर केला जाईल, त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.'पीएमपी आणि बस थांबे उभारणाऱ्या ठेकेदार कंपनीमध्ये करार झाला होता. या करारानुसार या ठेकेदाराने बस थांबे उभे करण्यासाठी महापालिकेच्या पथ विभाग, आकाशचिन्ह विभाग तसेच इतर विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक होते.

कोणत्याही विभागाची परवानगी घेतली नसल्याची माहिती संभूस यांना महापालिकेने दिली आहे. त्यानंतर संभूस यांनी पत्रकार परिषद घेत संबधित ठेकेदारावर कारवाई करुन त्याच्याकडून शुल्क घ्यावे, अशी मागणी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन केली होती.महापालिकेचा पथ विभाग हे सर्वेक्षण करणार असल्याचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले. पुणे शहरासह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत बस थांबे उभारण्यासाठी पीएमपीने निविदा प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार एका ठेकेदाराला हे काम देण्यात आले होते.बस थांबे उभारताना संबधित ठेकेदाराला महापालिकेच्या पथ विभागासह विद्युत तसेच इतर कोणत्याही विभागाची परवानगी न घेता परस्पर रस्ते खोदून बस थांबे उभारल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेत त्यांना ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत निवेदन दिले होते'कोणतीही परवानगी न घेता रस्ते खोदाई केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्याच्याकडून तिप्पट दंड वसूल केला जाणार आहे. तसेच शहरातील ज्या भागात ठेकेदाराने बस थांबे उभारताना महापालिकेकडून परवानगी घेतली नाही, त्याची शहानिशा करण्यासाठी सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे.

# काँग्रेस सोडणाऱ्यांना पुन्हा संधी नाही

## काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांची भूमिका

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'ज्यांना पक्षाने सर्व काही दिले, ते पक्ष सोडून गेले. पडत्या काळात पक्ष सोडून गेलेल्यांना पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. मात्र, अडचणीच्या काळात काँग्रेसबरोबर राहिलेल्या कार्यकर्त्यांना ताकद आणि संघर्षवेळी संरक्षण दिले जाईल,' अशी भूमिका राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी येथे मंगळवारी मांडली. दरम्यान, 'अडचणीच्या काळात पक्षाला सोडू नका. पक्ष देईल त्या उमेदवारासाठी एकदिलाने काम करा.**



पक्षविरोधात काम करू नका,' असा सल्लाही त्यांनी दिला.काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. त्या वेळी चेन्नीथला बोलत होते. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, नसीम खान, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, अमित देशमुख, डॉ. विश्वजित कदम यांच्यासह अन्य पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.'देश कठीण परिस्थितीतून जात आहे. शेजारील देशांबरोबरचे संबंध बिघडले आहेत. अमेरिका भारताला धमकी देत आहे. मात्र, धमक्यांना घाबरून पंतप्रधान मोदी उत्तर देत नाहीत. राहुल गांधी चीनबद्दल काही बोलले, तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश त्यावर टिप्पणी करतात. त्यामुळे यापुढील काळात काँग्रेसचे संघटन मजबूत करण्याचे काम करावे लागले. लोकशाही वाचविण्याच्या राहुल गांधी यांच्या लढाईमध्ये सर्वांनी सहभागी झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मशाल मोर्चा काढावा आणि स्वाक्षरी मोहीम राबवून राहुल गांधी यांच्या लढाईला शक्ती द्यावी,' असे चेन्नीथला यांनी सांगितले.

## सरकार काम करत नाही

'सरकार आणि पक्ष काम करत नाही, तेव्हा त्यांना नॅरेटिव्ह आणि परसेप्शनची आवश्यकता असते. काँग्रेसला त्याची गरज नाही. भाजपने खोटे वातावरण निर्मिती करण्याचे काम केले. काँग्रेसचा रस्ता हा सत्याचा आहे, तो कठीण आहे, पण त्याच मार्गाने काँग्रेस सुरुवातीपासून चालत आला आहे. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंनी लोकशाही आणि राज्यघटनेचा रस्ता निवडला.

## गोरक्षकांवर खोटे गुन्हे — उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्षपणे सुनावले

# गोरक्षण म्हणजे चिंचोका खेळणं नव्हे!

### आमदार महेश लांडगे : गोरक्षकांवरील खोट्या केसेस आम्ही खपवून घेणार नाही!

| पुणे |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गोरक्षक धर्माचे रक्षण करीत आहे. गोमातेच्या संवर्धनासाठी काम करीत आहेत. गोरक्षकांवर खोटे केस करण्याचा प्रयत्न कुणी केला. तर आम्ही कदापि सहन करणार नाही. गोरक्षण करणे म्हणजे चिंचोका खेळणं नाही. चुकीच्या पद्धतीने काही लोक प्रशासनासमोर गोरक्षकांबाबत मांडणी करीत आहेत. त्यांनी एकदा गोवंश कत्तलीसाठी घेवून जाणाऱ्या गाडीचा पाठलाग करावा, म्हणजे गोरक्षण काय आहे, हे तुम्हाला समजेल, अशी खणखणीत भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मांडली.**



> एखादा जिहादी, कोणी कुरेशी जातो आणि सांगतो.."गोरक्षक आमचे नुकसान करतात". त्यांना काय अडचण आहे. जुन्नरमधील बेकायदेशीर कत्तलखाने आम्ही बंद केले आहेत. गोमातेचे आम्ही रक्षण करणार आहोत. गोरक्षकांवर बंदी घालण्याची भाषा कोणी करु नये. गोरक्षण, लव्ह जिहाद, लॅन्ड जिहाद, धर्मांतर खपवून घेणार नाही. भाजपा महायुती हिंदूत्ववादी सरकार आहे. गोरक्षकांनी घाबरण्याचे कारण नाही.
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

इंदापूर येथे वीर सरदार मालोजीराजे भोसले यांची गढी आणि समाधी येथील अतिक्रमण हटवण्याबाबत सकल हिंदू समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित हिंदूत्ववादी जनसमुदायाला संबोधित करताना आमदार लांडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्षपणे सुनावले आहे.

तीन दिवसांपूर्वी कुरेशी समाजातील प्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यावेळी गोरक्षकांबाबत चुकीची मांडणी केली. त्यावर अजित पवार यांनी "गोरक्षकांना आवर घाला..." अशा सूचना पोलिस प्रशासनाला केल्या. याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यामुळे हिंदुत्ववादी संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजाची सूर आहे. हिंदूत्ववादी सरकार असतानाही गोरक्षकांवर बंदी घालण्याची भूमिका घेतली जात आहे, अशी खंत गोरक्षकांमधून व्यक्त होत होती. दरम्यान, इंदापूरच्या मोर्चामध्ये आमदार लांडगे यांनी "गोरक्षण म्हणजे चिंचोका खेळणं नव्हे.." असे वक्तव्य केल्यामुळे गोसंवर्धन आणि गोरक्षकांच्या मुद्यावरुन दोन 'दादा' पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे आमने-सामने आले आहेत, असे चित्र आहे.

# एम्पायर इस्टेट नजीक खड्ड्यांचा अडथळा

### महापालिकेकडून तात्पुरती डागडुजी करून मलमपट्टी करण्याचा नेहमीचाच प्रयत्न

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवडमधील एम्पायर इस्टेट पुलाखालून निगडीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर (जुना मुंबई-पुणे महामार्ग) मोठे खड्डे पडले आहेत. महापालिकेकडून तात्पुरती डागडुजी करून मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, अल्पावधीत रस्त्यावर पुन्हा खड्डे पडतात.**



> येथील खड्डयांवर दोन वेळा 'पॅचवर्क' केले होते. पावसामुळे 'पॅचवर्क' राहत नाही. कालपासून आम्ही या ठिकाणचे खड्डे बुजवण्याचे काम पुन्हा सुरू केले आहे. पाऊस कमी झाला की डांबरीकरण केले जाईल.
> **-मकरंद निकम, , शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

वर्दळीचा रस्ता असल्याने येथून दररोज हजारो वाहने प्रवास करतात. दुचाकी, चारचाकीसह अवजड वाहनांची देखील वर्दळ असते.


खड्डयांमुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडतात. तात्पुरत्या 'पॅचवर्क' मुळे पावसानंतर खडी वाहून गेली आहे. त्यातच रस्त्याचा काही भाग उखडला गेल्याने वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. दुचाकी चालकांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत आहे.

पिंपरीकडून चिंचवडला जाणाऱ्या वाहनांसाठी हा मुख्य रस्ता आहे. पुण्याहून चिंचवडला प्रवास करणाऱ्या नोकरदारांची; तसेच मोठ्या वाहनांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे कार्यालये सुटल्यानंतर सायंकाळच्या वेळी येथे वाहतूक कोंडी होते.

खड्यांमुळे अनेकदा लहानमोठे अपघात होतात. मोरवाडी चौक ते एम्पायर इस्टेट या पिंपरीकडून चिंचवडकडे येणाऱ्या मुख्य रस्त्यावर १२ ते १४ लहान-मोठे खड्डे आहेत. खड्यांना तात्पुरते 'पॅचवर्क' केले आहे. मात्र, किरकोळ पावसातच ही खडी वाहून खड्डे पूर्ववत झाले आहेत.

या रस्त्यावर 'अर्बन स्ट्रीट'चे काम सुरू आहे. त्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे सायंकाळच्या वेळी वाहतूक कोंडी होते. प्रशासनाकडून तात्पुरती डागडुजी केली जाते; पण त्याचा काही उपयोग होत नाही.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

शांत परमात्मस्मरण मिळत.

नवविधा भक्तीत जशी श्रवण ही पहिली भक्ती, तद्वतच अनेक संतलक्षणांत शांती हे पहिले लक्षण आहे. वास्तविक संतांची लक्षणे सांगता येणे कठीण. तरी पण असे म्हणता येईल की, शांती हे संतांचे मुख्य लक्षण आहे. पृथ्वी ही क्षमा-शांतिरूप आहे. त्याप्रमाणेच संत असतात. शांती ढळायला बाहेरची परिस्थिती कारण नसून अंतःस्थिती हीच कारण आहे. जिथे स्वार्थ तिथे अशांती. भगवंताहून मी निराळा अशी जिथे द्वैत-भावना, तिथे खरी शांती नाही. अनन्यतेने शांती प्राप्त होते, आणि तीच परमार्थाचा पाया आहे. पैसा आणि लौकिक ही अशाश्वत आहेत. त्यांच्यात चित्त ठेवल्याने अशांतीच येणार. शांती बिघडायला दोन कारणे आहेत. एक : गत गोष्टींचा शोक, आणि दुसरे : पुढची चिंता. आपल्या बाबतीत घडणारे मागले आणि पुढले हे दोन्ही ईश्वराधीन आहेत अशी दृढ समजूत झाली तर शांती बिघडणार नाही. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सदाचरण. सदाचरण नसेल तर शांती कधीही येणार नाही; पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. म्हणून प्रत्येक कर्म भगवंताला साक्षीने करावे. भगवंताला साक्षी ठेवून कर्म केले तर हातून दुष्कर्म होणार नाही. सदाचरण हा परमार्थाचा पाया आहे.

आपली शांती परिस्थितीवर अवलंबून नसावी. एका साधूला कुणीतरी शेतात झाडाखाली आणून ठेवले. तो तिथे स्वस्थ बसून नामस्मरण करीत असे. तिथे लोक त्याच्या दर्शनाला येऊ लागले. लोकांची ये - जा वाढल्यामुळे त्या शेताच्या मालकाला त्रास वाटू लागला, म्हणून त्याने त्या साधूला उचलून दुसरीकडे ठेवले. साधूची शांती पूर्वीच्या स्थळी होती, तशीच दुसऱ्या ठिकाणीही कायम होती. शेतमालकाला आश्चर्य वाटले. ज्याचे मन शांत आणि चिंतारहित असते त्याला कुठेही ठेवा, तो शांतच राहणार. म्हणून भगवंतावर विश्वास ठेवून स्वस्थ बसावे. त्याच्यावर भार घालून प्रपंच करावा. कर्तेपण आपल्याकडे घेऊ नये. अकर्तृत्वभाव ठेवावा. अशाने शांती येईल. जगच्चालक राम आहे ही भावना दृढ झाली तर शांती येईल. एकनाथांची शांती अगाध होती. नाथांसारखी शांती यायला परमभाग्य पाहिजे. राजेरजवाडे आले आणि गेले, पण ज्ञानेश्वरांचे नाव टिकले, कारण ते शांतीची मूर्ती होते. ही शांती काय केले असताना मिळेल ? भगवत्स्मरणावाचून अन्य उपायाने ती साधणार नाही. जे जे घडते ते ते भगवदिच्छेने घडते ही दृढ भावना असणे, हेच शांतीचे लक्षण आहे. कर्तृत्वाभिमान शांतीच्या आड येतो. विद्या, वैभव, कला, संपत्ती, संतती याने शांती येतेच असे नाही. निरपेक्षता हे शांतीचे मूळ आहे. मनाविरुद्ध गोष्ट घडल्यानंतर लगेच भगवंताची आठवण करावी म्हणजे आपोआप शांती येईल. मनातली शांती कायम ठेवून रागवता येते. तसे केल्यास हातून प्रमाद घडत नाही.

बोधवचन:- शांती परमात्मस्मरणाने मिळते. ते स्मरण अखंड ठेवावे आणि खुशाल प्रपंच करावा.



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# बांगलादेश झाला, पाकिस्तान झाले, भारताभोवतीचा विळखा अपयशी!

**अमेरिका स्वतः संपन्न असल्यामुळे इतर देशाच्या राजकारणामध्ये लुडबूड करणे, तिथे कट-कारस्थाने रचणे, भांडणे, संघर्ष किंवा युद्ध पेटवणे, हा त्यांचा आता नेहमीचा उद्योग झाला आहे. त्यात अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा स्वभाव हा विकृतीकडे झुकणारा असल्यामुळे त्यांना भारताचे भले कधीच पाहवत नाही, हे प्रथम लक्षात घ्यायला हवे !**



**भारतामधील कुभांडाचा पहिला अंक..**

जागतिक पातळीचा एकूण अंदाज घेता, भारताचे पाय खेचण्यासाठी काहीतरी कुभांड रचावे लागेल, पायात साप सोडावे लागतील, हे ट्रम्प यांच्या नियोजनामध्ये नक्की आहे आणि हे साप जर भारतामध्येच जन्मलेले असतील, तर त्यांच्यादृष्टीने सोन्याहून पिवळे !

**जरा कालक्रम समजून घ्या..**

भारताविरोधात काय कुरापती केल्या जाऊ शकतात, या शक्यतेचा उहापोह करण्यापूर्वी भारताच्या संदर्भात काय काय गोष्टी घडल्या किंवा त्या घडण्यापूर्वी आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये काय घडले? हे पाहणे उचित ठरणार आहे. बांगलादेश पाकिस्तान या देशांमध्ये घडलेले राजकारण, तेथील निवडणुका आणि सध्या भारतात जोर पकडत असलेले नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील वातावरण यात बरेच साम्य आहे, बरं का !

**हा निव्वळ योगायोग नाही..**

चला तर, या शक्यतांचा थेट विचार करू या. भारताला अस्थिर करण्याचा अमेरिका आणि त्यांच्या भारतात पाळलेल्या एजंटांचा हा सुनियोजित कट आहे. मुख्य म्हणजे असे कुभाण्ड आणि षडयंत्र असे यापूर्वीही घडले आहे. आताच त्याची पुनरावृत्ती होत नाही, तर यापूर्वी तीनदा पुनरावृत्ती झाली आहे, त्याची फार मोठी किंमत भारताला चुकवावी लागली आहे.

**नरेंद्र मोदींना घालवण्याचा कट ?**

पहिल्यांदा पाकिस्तानमध्ये डोकावू या. अमेरिकेविरुद्ध जाण्याची शिक्षा माजी पंतप्रधान इम्रान खान तुरुंगामध्ये भोगत आहे, तर बांगला देशच्या पंतप्रधान शेख हसीना पदच्युत झाल्यानंतर भारताच्या आश्रयाला आल्या आणि येथेच लपून राहत आहेत. या पार्श्वभूमीवर पाहा, आता नरेंद्र मोदींविरुद्ध काय चालले आहे ? सगळा पॅटर्न एकच आहे. २०२२ मध्ये, इम्रान खान यांना पाकिस्तानात दणका देण्यात आला. निवडणूक जिंकल्यानंतर, 'मतदारांच्या फसवणुकीचा' ढोल वाजवण्यात आला, देशातील नागरिकांना म्हणजेच मतदारांना भडकवण्यात आले. आणि त्याचा मोठा परिणाम म्हणजे 'व्हाईट हाऊस' च्या तालावर नाचणारे सरकार सत्तेवर आले. पाकिस्तानची लोकशाही उद्ध्वस्त झाली, अर्थव्यवस्था गहाण आहे आणि सध्या पाकिस्तानचे भवितव्य अमेरिकेच्या हातात आहे.

**खेळ बांगला देश मधील..**

बांगला देशमध्येही २०२४ मध्ये तोच खेळ झाला. तिथेही फासे अचूक पडले. शेख हसीना यांना पदावरून हटवण्यात आले, 'मतदार फसवणूक' चा नारा देण्यात आला आणि अमेरिकेच्या कठपुतळ्यांना खुर्चीवर बसवण्यात आले, अमेरिकेला पाहिजे त्याप्रमाणे आणि पाहिजे तसे सरकार सत्तेवर आले. बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेची धूळधाण झाली, त्यांना अमेरिकेच्या आश्रयाला जाणे भाग पडले ! याचा परिणाम काय? बांगला देशाचे निर्णय आता ढाक्यामध्ये नाहीत, तर वॉशिंग्टनमध्ये होतात.

**आता भारताची पाळी आहे..**

आपल्या देशामध्ये सध्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध संघर्ष करणारा काँग्रेसचेप्रणित 'इंडिया आघाडी' चा गट सक्रिय झाला आहे. त्यांना जनतेने एकामागून एक निवडणुकीत नाकारले आहे, ते 'मतदार फसवणूक' चा नवा सूर आळवत आहेत, 'व्होट चोरी' म्हणत निवडणूक आयोगावर जहरी टीका करत आहेत, मोर्चे काढत आहेत आणि हेच अमेरिकेला अपेक्षित आहे.

**भारतातल्या विरोधकांची लायकी काय?**

भारतातील या विरोधी पक्षांची लायकी काय? हा मुद्दा म्हणूनच उपस्थित होतो. खरे तर, पंचायत निवडणुका जिंकण्याची हिंमत नाही. पण त्यांचे धाडस पाहा.. ते अमेरिकेच्या चरणाचे दास बनून दिल्लीत सत्ता काबीज करण्याचे स्वप्न पाहत आहेत. दिल्लीची सत्ता अमेरिकेच्या पायावर वाहून आपले मुख्यालय वॉशिंग्टनला नेऊन त्याच्या किल्ल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात देण्याचा विचार करीत आहेत. भारताचे मजबूत नेतृत्व अमेरिकेला आवडत नाही, कारण मोदी आणि भारत त्यांच्यापुढे झुकत नाहीत, विकले जात नाहीत. म्हणूनच त्यांनी त्यांचे एजंट म्हणजे एनजीओ, मीडिया ब्रोकर्स आणि विरोधी पक्षातील भुकेलेले सत्तापीपासू सक्रिय केले आहेत. त्यांचे लक्ष्य भारतातील 'राजकारण बदल' आहे. म्हणजे देशातील निवडून आलेले सरकार पाडून कमकुवत, मूलतत्त्ववादी, सुखद आणि अमेरिकेने पोसलेले सरकार स्थापन करणे, एवढेच आहे.

**येन केन प्रकारेण सत्ता हवी !**

भारतातील विरोधकांना वाटेल ते करून सत्ता हवी आहे. जर काँग्रेस आणि त्यांच्या तुकडे-तुकडे गँगचा डाव यशस्वी झाला, तर भारताचा पंतप्रधान लोकांद्वारे निवडला जाणार नाही, तर व्हाईट हाऊसद्वारे निवडला जाईल, हे देशवासीयांच्या लक्षात आलेले आहे. या विकलेल्या, दलाल आणि परकीय मालकांविरुद्ध थेट लढा देण्याची वेळ आली आहे. ही फक्त निवडणूक अथवा लढाई नाही, तर ती भारताची ओळख, स्वाभिमान, आर्थिक स्वावलंबन, आदर आणि अस्तित्वाची लढाई आहे.

**हताश विरोधकांचे भकास डावपेच..**

सध्याच्या भारतीय जनता पक्षप्रणित एनडीए सरकारचे ज्या पद्धतीने काम सुरू आहे, ती यंत्रणा, ती शिस्तबद्धता आणि तो झपाटा पाहिला तर पुढील दहा वर्षे तरी विरोधी पक्षांना सत्तेच्या जवळपास फिरकणे ही शक्य होईल असे वाटत नाही आणि हे काँग्रेसी मानसिकता असणारे सत्तेशिवाय राहू शकत नाहीत, यातच त्यांच्या कारस्थानाचे गौडबंगाल दडले आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.



## भूमिका

**शेतकऱ्यांच्या विरोधानंतर केंद्र सरकारला तीन कृषीविषयक कायदे मागे घेणे भाग पडले तसेच कृषीप्रधान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंजाबमधील आम आदमी पक्षाच्या सरकारवर शेतकऱ्यांच्या विरोधानंतर भूसंपादन धोरण मागे घेण्याची नामुष्की आली. लोकाभिमुख सरकार अशी जाहिरातबाजी आप सरकारकडून केली जाते.**

# शेतकऱ्यांसाठी सारे पक्ष एकसारखेच!



हरितक्रांतीचे केंद्रस्थान असलेल्या पंजाबची अर्थव्यवस्था शेतीवर अधिक अवलंबून. पंजाबच्या सकल राज्य उत्पन्नात कृषी खात्याचा वाटा हा जवळपास २५ टक्के तर ६० टक्के लोकसंख्या ही कृषी वा कृषीवर आधारित उद्योगांशी संबंधित आहे. देशाच्या एकूण कृषी अर्थव्यवस्थेत पंजाबचा वाटा हा २० टक्क्यांच्या आसपास.

असताना भगवानसिंग मान यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पार्टी सरकारने राज्यातील ६५ हजार एकर जमीन संपादन करण्याचे धोरण तयार केले होते. लुधियाना, अमृतसर, मोहाली, जालंधर, पटियाला, मोगा, तरणतारण अशा कृषी उत्पादनात आघाडीवरील जिल्ह्यांमधील जमीन संपादित करून या जमिनीवर व्यावसायिक उद्योग व गृहसंकुले बांधण्याची पंजाब सरकारची योजना होती. भूसंपादनाच्या बदल्यात जमीन मालकाला एक हजार चौरस फुटाचा निवासी भूखंड किंवा २०० चौरस यार्डाची व्यापारी जागा मोबदला म्हणून दिला जाणार होता. भूसंपादनाचे हे धोरण गेल्या जून महिन्यात जाहीर करण्यात आले पण त्याला जमीन मालकांकडून फारच अल्प प्रतिसाद मिळाला होता. यावर पंजाब सरकारने शेतकऱ्यांना या धोरणाचे महत्त्व समजवून सांगण्यासाठी अधिकाऱ्यांना गावोगावी पाठविले होते. केंद्र सरकारच्या तीन कृषी कायद्यांना आम आदमी पार्टीने विरोध दर्शवला होता; त्याच पक्षाने पंजाबात सत्ताधारी झाल्यावर शेतकऱ्यांची जमीन संपादन करण्याचे धोरण राबवणे हा दुटप्पीपणाच. शेतकऱ्यांचा विरोध स्पष्ट होताच काँग्रेस, अकाली दल आणि भाजपनेसुद्धा या राज्यात आम आदमी पार्टीला 'शेतकरी विरोधी' ठरवण्याची चढाओढच लावली. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने धोरणाबाबत प्रश्न उपस्थित केले आणि मुळात सत्ताधारी आम आदमी पार्टीतच या धोरणावरून दोन गट पडले. एवढे झाल्यावर, धोरण मागे घेत असल्याचे पंजाब सरकारने दोन ओळींच्या परिपत्रकाद्वारे सोमवारी जाहीर केले. ही एक प्रकारे मुख्यमंत्री मान आणि आप सरकारसाठी नामुष्कीच.

अशीच नामुष्की अनेकांवर वेळोवेळी आलेली आहे. त्याला कोणताही प्रमुख पक्ष अपवाद नाही. कर्नाटकातील काँग्रेस सरकारला गेल्याच महिन्यात शेतकऱ्यांच्या विरोधानंतर केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील १३ गावांमधील १,७७७ एकर सुपीक जमीन संपादन करण्याचा निर्णय रद्द करणे भाग पडले. देवनहळ्ळी तालुक्यात अवकाश व विमान उद्योग संकुल उभारण्याकरिता ही जमीन संपादित करण्याची कर्नाटक सरकारच्या औद्यौगिक विकास विभागाची योजना होती. त्याविरोधात या गावांमधील शेतकऱ्यांनी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ म्हणजेच १,१९८ दिवस आंदोलन केले होते. शेवटी शेतकऱ्यांच्या दबावापुढे कर्नाटकातील काँग्रेस सरकारला झुकावे लागले. कर्नाटक सरकारने विमान उद्योगाचा हा प्रकल्प रद्द करताच शेजारील आंध्र प्रदेशने प्रकल्पासाठी जमीन देण्याची लगेच तयारी दर्शवली. तत्पूर्वी, तेलंगणामध्ये हैदराबाद शहराचे उपनगर असलेल्या गच्चीबोवली भागातील ४०० एकर हिरव्यागार जागेत माहिती तंत्रज्ञान संकुल उभारण्याची योजना काँग्रेस सरकारने आखली होती. वृक्ष तोडण्यासाठी बुलडोझर लावण्यात आले होते. नव्याने उद्योग सुरू करण्यासाठी ही जमीन आवश्यक असल्याचा दावा मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी यांनी केला होता. हैदराबाद विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जंगल कापण्यास सक्त विरोध केला होता. शेवटी हा वाद सर्वोच्च न्यायालयात गेला आणि तेथे संपादनास स्थगिती देण्यात आली. त्याआधी मोदी सरकारने करोनाकाळात केलेल्या तीन कृषी कायद्यांना शेतकऱ्यांनी सक्त विरोध दर्शवला होता. दिल्लीच्या सीमेवर शेतकरी नेत्यांनी ठिय्या आंदोलन केले होते. कृषी कायद्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल.

## संपादकीय »

### ॲनिमल फार्म?


***भटके कुत्रे आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या कथित समस्या यांवरील प्रतिक्रिया बहुश: भावनिक असतात. यावर आदेश देताना न्यायालयात तरी भावनिकता चार हात दूर हवी..***

कृत्रिम बुद्धिमत्तेचे गंभीर आव्हान, अशी बुद्धिमान यंत्रे तयार करण्यासाठी आवश्यक मायक्रोचिप्स, संगणकाची वैद्यकीय क्षेत्रातील घुसखोरी, स्वयंचलनाचा वाढता टक्का आणि या सगळय़ांमुळे रोजगारांवर आलेले संकट इत्यादी गहन विषयांवरील चर्चेत शहाणे जग बुडालेले असताना आपले सार्वजनिक जीवनातील बोलविषय काय? कबुतरे, हत्ती, चर्चाविषयांचे केंद्रस्थान आधीपासून बळकावून बसलेल्या गोमाता आणि आता कुत्रे. सगळा आसमंत आपण निर्माण केला असून तो फक्त आणि फक्त आपल्यासाठी आहे असा मनुष्यप्राण्याचा समज असल्याने अन्य कोणत्याही प्राण्याशी पैस वाटून घेणे त्यास नामंजूर. मानवप्राण्यांत ज्याप्रमाणे जातिव्यवस्था असते त्याच धर्तीवर प्राण्यांचीही विभागणी केली जात असल्याने गावकुसाबाहेरच्या द्विपादांप्रमाणे चतुष्पाद श्वानही त्यांस नकोसे असतात.

एकेकाळी जलव्यवस्थापनात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राची आज या क्षेत्रात अधोगती झाली आहे. विशेषत: सिंचन घोटाळ्यामुळे राज्यातील पाणी-व्यवस्थेला जीवघेणा धक्का बसला आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी गांभीर्यपूर्वक काम करावे लागेल.

# महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था म्हणजे अनागोंदी

जल-व्यवस्थापनात २०१५-१६ साली देशात चौथ्या स्थानावर असणारा महाराष्ट्र २०१६-१७ साली पाचव्या तर २०१७-१८ साली आठव्या स्थानावर होता. निती आयोग विकसित कॉम्पोझिट वॉटर मॅनेजमेंट इंडेक्स-२.० आधारे तयार करण्यात आलेल्या अहवालात ५६ गुण देऊन महाराष्ट्राची कामगिरी 'मध्यम'स्वरूपाची ठरविण्यात आली आहे. यूएन, यूएनडीपी इत्यादी संस्थांच्या मदतीने निती आयोगानेच विकसित केलेल्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स इंडिया इंडेक्स आधारे तयार करण्यात आलेल्या २०२३-२४ सालच्या अहवालात महाराष्ट्राला ७३ गुण देण्यात आले आहेत. देशातील एकूण ५७४५ मोठ्या प्रकल्पांपैकी २,३९४ (४२) मोठे आणि एकूण बांधकामाधीन प्रकल्पांपैकी ६७ प्रकल्प एकट्या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राची तुलना देशातील अन्य कोणत्याही राज्याबरोबर करता येत नाही कारण जल संपदा विभाग




एकूण नक्की किती क्षेत्र अधिकृतरीत्या सिंचित आहे हेच सांगत नाही. (पाहा: भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक, पृष्ठ क्र. ३०३, स्तंभ क्र ४८, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४)सिंचन संपत्तीचा विकास १४३० कोटी रुपये भांडवली खर्च करून १९६१ ते १९८० या २० वर्षांत होईल आणि अंतिम सिंचन क्षमता ४५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते असे दोन अंदाज बर्वे आयोगाने व्यक्त केले होते. जलसंपत्तीचा विकास, जो १९८० साली पूर्ण होणे अपेक्षित होते, तो अद्याप सुरूच आहे. राज्याने सिंचन प्रकल्पात (मार्च २०१८ अखेर) एकूण रु. १,२२,७९३ कोटी गुंतवणूक केली असून बांधकामाधीन प्रकल्पांची (१ एप्रिल २०१८) उर्वरित किंमत रु. ८३,६६४ कोटी रुपये आहे.सिंचन घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चितळे समितीने खालील धक्कादायक माहिती दिलेली आहे. 'प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाली तथापि प्रथमत: अनुदान विलंबाने प्राप्त झाले असे ६८ प्रकल्प आहेत. उपरोक्त प्रकारे विलंबाचा कालावधी दोन वर्षापासून २६ वर्षांपर्यंत दिसून येतो. प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झाल्यानंतरही काही प्रकल्पांच्या प्रत्यक्ष धरणाचे काम सुरू होण्यास विलंब झाल्याचे निदर्शनास येते. ६२ प्रकल्पांमध्ये असा विलंब झाल्याचे आढळून येते. विलंबाचा हा कालावधी दोन वर्षांपासून ते १९ वर्षांपर्यंत दिसून येतो.वापराकरिता एकूण १,३९,०८३ दलघमी पाणी उपलब्ध असले तरी आजमितीचा एकूण प्रकल्पीय उपयुक्त जलसाठा ५१,८०० दलघमी (४५) एवढाच आहे. कारण कोकणातील पाणी राज्यात अन्यत्र वापरणे कठीण आहे

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**ठाकरेंचा इशारा** खेळण्यासाठी मैदाने देखील शिल्लख राहत नाहीत

# शिवसेना तळपती तलवार, हात लावू नका!

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना भारतीय जनता पक्षासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली. तसेच आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) मुंबई महापालिका जिंकणारच असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच 'शिवसेना जिवंत आहे, शिवसेना तलवारीसारखी धारदार आहे. तळपती तलवार लांबून बघा, पण हात लावायच्या भानगडीत पडू नका', असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. त्यांच्या या विधानाचा रोख नेमकी कोणाकडे होता? याबाबत आता चर्चा रंगली आहे.**

## मतांची चोरी कशी केली?



"सध्या मोठमोठे राक्षस उभे राहिले आहेत. विकास झालाच पाहिजे, पण टॉवर मोठ्या प्रमाणात उभे राहत आहेत. मोकळ्या जागा संपवल्या जात आहेत. मुलांना खेळण्यासाठी मैदाने देखील शिल्लख राहत नाहीत, किंवा आपले सण, उत्सव साजरे करण्यासाठी देखील जागा राहत नाहीये. मग आम्ही उत्सव कुठे साजरे करायचे?", असं उद्धव ठाकरे म्हणाले.आता तुम्ही सर्वजण मंडळाचे कार्यकर्ते आहात. तुम्ही मंडप वैगेरे टाकला की आम्ही मिरवायला आलोच तिकडे. तुम्ही आमचंही स्वागत करता. पण मी आता फार मोचक्या मंडळांना भेटी देतो. अन्यथा आधी मी इकडे खूप फिरायचो. आजही काही लोक आमच्याकडे येतात आणि म्हणतात साहेब मंडळाला ७५ वर्ष झाले आहेत, आमच्याकडे या. मग यावसं वाटतं. पण आल्यानंतर अडचण अशी होते की एकाकडे आलं की लगेच दुसऱ्याकडेही जावं लागतं. कारण हे प्रेम आहे. मंडळं पळवापळवीची गोष्ट वेगळी. पण प्रेम विकलं जाऊ शकत नाही", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं."आज जर कोणाला वाटत असेल की शिवसेनेकडे काय आहे? तर काय आहे हे काल देखील संपूर्ण महाराष्ट्राने आणि देशाने पाहिलेलं आहे. शिवसेना ही जिवंत आहे, शिवसेना ही तलवारीसारखी धारदार आहे, हात लावायला जाऊ नका. लांबून तळपती तलवार पाहा. मात्र, या तलवारीला हात लावायच्या भानगडीत पडू नका", असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. "कोणाला वाटत असेल की आता सत्ता नाही, महापालिका नाही. कारण हे निवडणुका घेऊ शकत नाहीत. ज्या निवडणुका घेतल्या, त्यामध्ये मतांची चोरी कशी केली? हे काल-परवा समोर आलं. लोकसभेनंतर विधानसभेचा निकाल कसा लागला? हे देखील राहुल गांधींनी उघड केलं. मग अशा पद्धतीने चोरून आणलेली सत्ता तुम्हाला काय न्याय देणार? त्यामुळे तुम्ही चिंता करू नका. शिवसेना जनतेला न्याय मिळू देण्यासाठी एक क्षण देखील डगमगणार नाही. शिवसेना तुमच्या बरोबर कायम असेल", असं उद्धव ठाकरे म्हणाले.शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना भारतीय जनता पक्षासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली. तसेच आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) मुंबई महापालिका जिंकणारच असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच 'शिवसेना जिवंत आहे, शिवसेना तलवारीसारखी धारदार आहे. तळपती तलवार लांबून बघा, पण हात लावायच्या भानगडीत पडू नका', असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. त्यांच्या या विधानाचा रोख नेमकी कोणाकडे होता? याबाबत आता चर्चा रंगली आहे. "सध्या मोठमोठे राक्षस उभे राहिले आहेत. विकास झालाच पाहिजे, पण टॉवर मोठ्या प्रमाणात उभे राहत आहेत. मोकळ्या जागा संपवल्या जात आहेत. मुलांना खेळण्यासाठी मैदाने देखील शिल्लख राहत नाहीत, किंवा आपले सण, उत्सव साजरे करण्यासाठी देखील जागा राहत नाहीये. मग आम्ही उत्सव कुठे साजरे करायचे?

## उद्धव ठाकरे काय म्हणाले?

तुम्ही मंडप वैगेरे टाकला की आम्ही मिरवायला आलोच तिकडे. तुम्ही आमचंही स्वागत करता. पण मी आता फार मोचक्या मंडळांना भेटी देतो. अन्यथा आधी मी इकडे खूप फिरायचो. आजही काही लोक आमच्याकडे येतात आणि म्हणतात साहेब मंडळाला ७५ वर्ष झाले आहेत, आमच्याकडे या. मग यावसं वाटतं. पण आल्यानंतर अडचण अशी होते की एकाकडे आलं की लगेच दुसऱ्याकडेही जावं लागतं.

# पालकमंत्रीपदाचा तिढा, महायुतीत धुसफूस

## मंत्रिमंडळ बैठकीला शिंदे अनुपस्थित, गोगावले दिल्लीत

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा कायम असतानाच स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणाची संधी आदिती तटकरे यांना देण्यात आल्याने शिवसेना शिंदे गटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व भरत गोगावले हे दोघे अनुपस्थित होते. नाराज गोगावले यांनी नवी दिल्लीत जाऊन भाजपचे अध्यक्ष जयप्रकाश नड्डा यांची भेट घेतली.**



पालकमंत्रीपदाला स्थगिती असतानाही गिरीश महाजन यांना नाशिक तर आदिती तटकरे यांना रायगडमध्ये ध्वजारोहणाचा मान मिळाल्याने महायुतीतील वाद अधिकच चिघळला. आदिती तटकरे यांच्या नावाची घोषणा होताच मंत्री भरत गोगावले प्रचंड नाराज झाले. त्यांनी आपली नाराजी एकनाथ शिंदे यांना कळवली. मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपमुख्यमंत्री शिंदे व गोगावले हे दोघेही अनुपस्थित होते. शिंदे हे जम्मूमध्ये असल्याचे सांगण्यात आले. गोगावले यांनी शिंदे यांच्या सूचनेवरून नवी दिल्लीत जाऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांची भेट घेत आपली नाराजी त्यांच्याकडे व्यक्त केली.दरम्यान, रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा सुटलेला नसताना मुख्यमंत्र्यांनी रायगडमध्ये आदिती तटकरे व गोगावले यांच्याऐवजी त्रयस्थाकडे ही जबाबदारी सोपविली असती तर अधिक चांगले झाले असते. याबाबतची नाराजी शिंदे यांनी वरिष्ठांच्या कानावर घातल्याचे शिवसेनेच्या एका ज्येष्ठ मंत्र्याने सांगितले.झेंडावंदनाची संधी मिळाली म्हणजे पालकमंत्रीपद मिळाले असे नाही. आपण पालकमंत्रीपदावर आजही १०० टक्के ठाम आहेत. वरिष्ठ जो निर्णय घेतील तो मान्य असेल.

## गोगावलेंसाठी आग्रही

ध्वजारोहण प्रत्येक जिल्ह्यात कोण कुठे करणार आहे, याबाबतची यादी प्रसिद्ध झाली आहे. भरत गोगावले हेच रायगडचे पालकमंत्री व्हावेत यासाठी आम्ही आग्रही असल्याचे शिंदे गटाचे प्रवक्ते आणि मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. तर नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असलेले मंत्री दादा भुसे यांनीही याबाबतचे सर्व निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री घेत असतात.

**तक्रार**

## पाच खासदारांची लोकसभा अध्यक्षांकडे लेखी तक्रार

# एअर इंडियाने भंग केल्याचा आरोप!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**थिरुअनंतपुरम-दिल्ली विमान चेन्नईला वळवून विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसचे के सी वेणुगोपाल यांच्यासह पाच खासदारांनी मंगळवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून ‘एअर इंडिया’वर कारवाईची मागणी केली आहे. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे के. सुरेश, अदूर प्रकाश आणि रॉबर्ट ब्रूस, तसेच ‘सीपीआय’चे (एम) के. राधाकृष्णन यांनी नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांना पत्र लिहून घटनेची तत्काळ चौकशीची मागणी केली.**

### आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी




बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात खासदारांनी म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी विमान ‘एआय २४५५’मधून (थिरुअनंतपुरम-दिल्ली) येत असताना, ‘एअर इंडिया’ने विशेषाधिकाराचे उल्लंघन केले. ‘त्या तारखेला, आम्ही इतर शेकडो प्रवाशांसह प्रवास करत होतो. सायंकाळी ७:१५ वाजता नियोजित असलेले हे विमान रात्री ८:३० च्या सुमारास निघाले. सुरुवातीपासूनच प्रवासात बराच गोंधळ उडाला. प्रवाशांना थांबून राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि खानपान सेवाही थांबवण्यात आली,’ असे खासदारांनी सांगितले. उड्डाण झाल्यानंतर वैमानिकाने एक गंभीर तांत्रिक बिघाड असल्याचे कारण सांगत विमान चेन्नईला वळवण्यात येईल असे जाहीर केले. चेन्नईच्या हवाई क्षेत्रात पोहोचल्यानंतर, विमान उतरले नाही परंतु एका तासापेक्षा जास्त काळ ते फिरत राहिले. दरम्यान, यामागचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही, असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे.थिरुअनंतपुरम-दिल्ली विमान चेन्नईला वळवून विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसचे के सी वेणुगोपाल यांच्यासह पाच खासदारांनी मंगळवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून ‘एअर इंडिया’वर कारवाईची मागणी केली आहे. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे के.सुरेश,अदूर प्रकाश आणि रॉबर्ट ब्रूस, तसेच ‘सीपीआय’चे (एम) के.राधाकृष्णन यांनी नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांना पत्र लिहून घटनेची तत्काळ चौकशीची मागणी केली. बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात खासदारांनी म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी विमान ‘एआय २४५५’मधून (थिरुअनंतपुरम-दिल्ली) येत असताना, ‘एअर इंडिया’ने विशेषाधिकाराचे उल्लंघन केले. ‘त्या तारखेला, आम्ही इतर शेकडो प्रवाशांसह प्रवास करत होतो. सायंकाळी ७:१५ वाजता नियोजित असलेले हे विमान रात्री ८:३० च्या सुमारास निघाले.

### पत्र लिहून कारवाईची मागणी

सायंकाळी ७:१५ वाजता नियोजित असलेले हे विमान रात्री ८:३० च्या सुमारास निघाले. सुरुवातीपासूनच प्रवासात बराच गोंधळ उडाला. थिरुअनंतपुरम-दिल्ली विमान चेन्नईला वळवून विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसचे के सी वेणुगोपाल यांच्यासह पाच खासदारांनी मंगळवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे.

सुरुवातीपासूनच प्रवासात बराच गोंधळ उडाला. प्रवाशांना थांबून राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि खानपान सेवाही थांबवण्यात आली,’ असे खासदारांनी सांगितले. उड्डाण झाल्यानंतर वैमानिकाने एक गंभीर तांत्रिक बिघाड असल्याचे कारण सांगत विमान चेन्नईला वळवण्यात येईल असे जाहीर केले. चेन्नईच्या हवाई क्षेत्रात पोहोचल्यानंतर, विमान उतरले नाही परंतु एका तासापेक्षा जास्त काळ ते फिरत राहिले. दरम्यान, यामागचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही, असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे.प्रवाशांना थांबून राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि खानपान सेवाही थांबवण्यात आली,’ असे खासदारांनी सांगितले. उड्डाण झाल्यानंतर वैमानिकाने एक गंभीर तांत्रिक बिघाड असल्याचे कारण सांगत विमान चेन्नईला वळवण्यात येईल असे जाहीर केले. चेन्नईच्या हवाई क्षेत्रात पोहोचल्यानंतर, विमान उतरले नाही परंतु एका तासापेक्षा जास्त काळ ते फिरत राहिले. दरम्यान, यामागचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही,असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहेओम बिर्ला यांना पत्र लिहून‘एअर इंडिया’वर कारवाईची मागणी केली आहे. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे के.सुरेश,अदूर प्रकाश आणि रॉबर्ट ब्रूस, तसेच ‘सीपीआय’चे (एम) के.राधाकृष्णन यांनी नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांना पत्र लिहून घटनेची तत्काळ चौकशीची मागणी केली. १० ऑगस्ट रोजी विमान ‘एआय २४५५’मधूनयेत असताना, ‘एअर इंडिया’ने विशेषाधिकाराचे उल्लंघन केले.

# आंध्र मद्य घोटाळाप्रकरणी पुरवणी आरोपपत्र

## जगनमोहन रेड्डींच्या नेतृत्वात धोरण बैठक झाल्याचा आरोप

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आंध्र प्रदेशातील कथित मद्य घोटाळा प्रकरणी राज्य पोलिसांनी मंगळवारी पुरवणी आरोपपत्र दाखल केले. त्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांचा आरोपी म्हणून समावेश करण्यात आला आहे. हा कथित मद्यघोटाळा ३,५०० कोटी रुपयांचा असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. जगनमोहन रेड्डी यांनी जुलै २०१९मध्ये एका नवीन मद्य धोरणाशी संबंधित बैठकीचे अध्यक्षपद भूषवले होते.**



या धोरणांतर्गत मद्याची दुकाने ‘एपीएसबीसीएल’ या सरकारी संस्थेद्वारे चालवली जाणार होती, असा आरोप पोलिसांनी केला आहे. या घोटाळ्याची चौकशी करत असलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) सोमवारी १२४ पानांचे पुरवणी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले.


गेल्या महिन्यात दाखल केलेल्या आरोपपत्रात माजी मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी हे दरमहा सरासरी ५०-६० कोटी रुपयांची लाच स्वीकारणाऱ्यांपैकी एक असल्याचा उल्लेख होता. तथापि, ३०५

### नियम डावलून नियुक्ती

डी. वासुदेव रेड्डी (आरोपी क्र. २) यांची इतर पदांसाठी शिफारस करूनही, जगन यांनी त्यांची एपीएसबीसीएलचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असाही आरोपही पोलिसांनी केला आहे. मात्र आरोपपत्रातील सर्व आरोप निराधार असल्याचे माजी मंत्री आणि वायएसआरसीपीचे ज्येष्ठ नेते अंबाती रामबाबू यांनी पीटीआयला सांगितले.

पानांच्या आरोपपत्रात जगन यांचा आरोपी म्हणून थेट उल्लेख केला नव्हता. मात्र पुरवणी आरोपपत्रामध्ये लाचखोरीची रक्कम पद्धतशीरपणे कमी-महत्त्वाच्या व्यक्ती, जसे की कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत वळवली गेली, असा असा आरोप करण्यात आला आहे. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २०१९ मध्ये झालेल्या बैठकीत, दुकानांची संख्या, जागा भाड्याने घेणे, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि वाहतूक खर्च यासंबंधीच्या बाबी निश्चित करण्यात आल्या होत्या, असे पोलिसांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, एपीएसबीसीएल यांच्या पत्राचा हवाला देत म्हटले आहे.

# धनुषला व्हायचं शेफ



अभिनेता धनुष आज 40 वर्षांचा झाला आहे. शेफ बनण्याचे स्वप्न पाहणारा धनुष आपल्या भावाच्या सांगण्यावरून चित्रपटात आला आणि प्रसिद्ध झाला. इंडस्ट्रीतील सुपरस्टार रजनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या जेव्हा त्याच्या प्रेमात पडली तेव्हा धनुष साऊथ सिनेसृष्टीत छाप पाडत होता. आयुष्य बदलत राहिले आणि यश येत राहिले. वर्षभरापूर्वी, धनुष आपला मुलगा असल्याचा दावा करणारे जोडपे समोर आले होते. याच्या काही काळापूर्वी धनुषचे काही खासगी फोटोही लीक झाले होते, ज्यामुळे त्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याबाबत त्याला विचारणा केली असता त्याने एका टीव्ही चॅनलसाठी मुलाखत घेणाऱ्या तरुणीला खडसावले आणि लगेचच माईक काढून बाहेर निघून गेला.या व्यतिरिक्त धनुषने फोर्ब्सच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या स्टार्सच्या यादीत 6 वेळा स्थान मिळवले आहे. धनुषचे यूट्यूबवर अनेक रेकॉर्ड आहेत. धनुषचा जन्म 28 जुलै 1983 रोजी मद्रास येथे तामिळ चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माती कस्तुरी राजा यांच्या घरी झाला. त्यांचे नाव व्यंकटेश प्रभू कस्तुरी राजा होते. धनुषला नेहमीच शेफ बनायचे होते, त्यासाठी हॉटेल मॅनेजमेंट स्कूलमध्ये जाण्याचे त्याचे स्वप्न होते. धनुषच्या वडिलांच्या वाटेवर त्याचा मोठा भाऊही दिग्दर्शक झाला, त्यामुळे धनुषने शेफऐवजी अभिनेता व्हावे अशी त्यांची इच्छा होती. धनुषने मोठ्या भावाची आज्ञा मानून प्रवेश घेतला नाही. धनुषने वयाच्या 19 व्या वर्षी त्याच्या वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या थुल्लुवधो इल्लामई (2002) या तमिळ चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि त्याचे नाव व्यंकटेश बदलून धनुष ठेवले. धनुषने 1996 च्या कुरुथीपुनल चित्रपटात दाखविलेल्या ऑपरेशन धनुषपासून प्रेरणा घेऊन त्याचे स्क्रीन नाव ठेवले. धनुषचा पहिला चित्रपट 'थुल्लूवधो इल्लमाई' बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवू शकला नाही. या चित्रपटानंतर धनुषला ना कोणतीच ओळख मिळाली, ना त्याला इतर कोणत्याही चित्रपटाची ऑफर आली. अशा परिस्थितीत त्याचा मोठा भाऊ सेल्वाराघवन याने धनुषला त्याच्या दिग्दर्शकीय पदार्पण चित्रपट 'कढाल कोंडें' (2003) मध्ये कास्ट केले. धनुष एक दिवस कढाल कोंडेंसाठी शूटिंग करत होता. सेटवर काही लोक शूटिंग पाहण्यासाठी आले होते. धनुषला पाहताच त्यांनी जवळ येऊन विचारले की चित्रपटाचा नायक कोण आहे. त्यावेळी धनुषला स्वतःला हिरो म्हणवण्याचा आत्मविश्वास नव्हता. लोक त्याची चेष्टा करतील हे त्याला माहीत होते, म्हणून त्याने दुसऱ्या कास्ट सदस्याकडे बोट दाखवले. ते लोक हिरोला शोधू लागले तेव्हा कोणीतरी धनुषकडे बोट दाखवले. हे जाणून ते लोक जोरजोरात हसू लागले. धनुषकडे बोट दाखवत ते लोक म्हणाले, त्या ऑटोचालकाकडे बघ, तो हिरो आहे. ते लोक खूप मस्करी करत होते. हे पाहून धनुष गाडीतून पळून गेला आणि जोरजोरात रडू लागला. 19 वर्षांचा धनुष हा अपमान सहन करू शकला नाही कारण सगळे त्याची चेष्टा करायचे.

# माधुरीने चालवली बोट



माधुरी दीक्षित सध्या तिच्या कुटुंबासोबत सुट्टी साजरी करत आहे. अलीकडेच त्यांचे पती डॉ. श्रीराम नेने यांनी व्हॅकेशन दरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. ज्यामध्ये 56 वर्षीय माधुरी इटलीच्या लेक कोमोमध्ये स्पीड बोट चालवताना दिसत आहे. स्वतः डॉ.नेने यांनी हा सेल्फी व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये माधुरी स्पीड बोट चालवत असून ते व्हिडिओ शूट करत आहेत. व्हिडिओमध्ये या दोघांसोबत त्यांच्या मुलाचीही झलक पाहायला मिळत आहे. व्हिडिओ शेअर करताना नेनेने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'जेव्हा बॉस गाडी चालवतो'. लुकबद्दल बोलायचे झाले तर माधुरी काळ्या टॉपसह हिरव्या पँटमध्ये दिसली, यासोबत तिने टॉपवर प्रिंटेड शर्ट घातला आहे, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. काळ्या गॉगलसह हा लूक पूर्ण केला आहे. तर तिचा नवरा काळ्या टी-शर्ट आणि सनग्लासमध्ये दिसत आहे. 'बॉस क्वीन टेक द व्हील' असे म्हणत चाहत्यांनी व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली. आणखी एका यूजरने लिहिले की, 'माधुरी एक सदाबहार सौंदर्य आहे.' तिसऱ्याने लिहिले, 'वाह, खूप सुंदर मॅडम आणि खूप सुंदर कुटुंब'. यावर टिप्पणी करताना, आणखी एका वापरकर्त्याने म्हटले – सुंदर व्हिडिओ, माधुरी दीक्षित आणि डॉ. नेने यांची जोडी नंबर 1 आहे. वर्क फ्रंटवर, माधुरी दीक्षित शेवटची 'द फेम गेम'मध्ये दिसली होती. ही एक वेब सीरिज होती जी ओटीटीवर रिलीज झाली होती, या शोमध्ये मानव कौल, संजय कपूर यांच्यासोबत मुख्य भूमिकेत होते. याशिवाय मजा मां हा चित्रपटही प्रदर्शित झाला आहे.

# सामंथाचा आइस बाथ



साऊथची सुपरस्टार सामंथा रुथ प्रभू हिने सध्या प्रकृतीच्या कारणास्तव अभिनय जगतापासून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री सध्या सुटी घेऊन बाली इंडोनेशियामध्ये सुट्टी साजरी करत आहे. समंथा तिच्या सोशल मीडियावर तिच्या व्हॅकेशनमधील फोटो आणि व्हिडिओ सतत शेअर करत असते. तिने तिच्या इंस्टाग्रामवर आणखी एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती 4 डिग्री तापमानातआइस बाथ करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सामंथा बाथटबमध्ये बसली आहे. ती या बर्फाळ पाण्यात सतत 6 मिनिटे राहिली. आईस बाथ स्नायू दुखणे आणि सूज दूर करण्यासाठी खूप फायदेशीर आहे. हा व्हिडिओ पोस्ट करत सामंताने कॅप्शन दिले, '#ICEBATH 4 डिग्री 6 मिनिटे. सामंथाने तिच्या अलीकडील प्रोजेक्ट्स सिटाडेल आणि कुशीचे शूटिंग पूर्ण केल्यानंतर कामातून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री जवळजवळ एक वर्षापासून मायोसिटिस नावाच्या ऑटोइम्यून रोगाशी झुंज देत आहे. आता तिला तिच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे. ज्या प्रकल्पांसाठी अभिनेत्रीने निर्मात्यांकडून आगाऊ फी घेतली होती, ते सर्व पैसे तिने निर्मात्यांना परत केले आहेत. सामंथा शेवटची पौराणिक चित्रपट शकुंतलममध्ये दिसली होती, जो बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल बोलायचे झाले तर ती विजय देवरकोंडा सोबत कुशी या चित्रपटात दिसणार आहेयाशिवाय राज आणि डीके यांच्या सिटाडेल या मालिकेतही सामंथा दिसणार आहे. या मालिकेत सामंथासोबत वरुण धवन आहे.

# जान्हवी कपूरचा रॅम्पवॉक



फॅशन डिझाइन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) द्वारे आयोजित इंडिया कॉउचर वीक 26 जुलैपासून सुरू झाला आहे. येथे इंडस्ट्रीतील सर्व मोठ्या डिझायनर्सनी त्यांचे कलेक्शन सादर केले. जान्हवी कपूर या कार्यक्रमात रॅम्पवर आली आणि फॅशन डिझायनर गौरव गुप्तासाठी शोस्टॉपर बनली. जान्हवीने निळ्या रंगाच्या लेहंग्यामध्ये रॅम्पवॉक केला. कार्यक्रमात जान्हवी शानदार निळ्या रंगाच्या लेहेंग्यात खूपच सुंदर दिसत आहे. तिने लेहेंग्यासोबत मॅचिंग स्ट्रेपी ब्लाउज आणि केप दुपट्टा घातला होता. अभिनेत्रीने न्यूड मेकअप आणि वेवी हेयर शैलीने या लुकला पूरक केले आहे. जान्हवीने अतिशय ग्रेस आणि ग्लॅमरसह रॅम्पवॉक केला. या कार्यक्रमातील जान्हवीचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यावर तिचे चाहते कमेंट करत तिचे कौतुक करत आहेत. जान्हवीच्या व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'बॉलिवुडची हॉटेस्ट सेलिब्रिटी'. दुसऱ्याने लिहिले, 'वाह'. तिसऱ्या यूजरने कमेंट करताना लिहिले, ' ती खूप सुंदर दिसत आहे'. कमेंट करताना दुसऱ्या यूजरने लिहिले, 'वाह, खूप सुंदर रंग'. जान्हवी कपूरचा बावल हा चित्रपट 21 जुलै 2023 रोजी OTT प्लॅटफॉर्म AMAZON PRIME VIDEO वर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून जान्हवीने वरुण धवनसोबत पहिल्यांदा स्क्रीन शेअर केली आहे. याशिवाय जान्हवी लवकरच ज्युनियर एनटीआरच्या चित्रपटातून टॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. 'NTR 30' पुढील वर्षी रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

# प्रभासचे फेसबुक अकाउंट हॅक



प्रभासचे अधिकृत फेसबुक अकाउंट हॅक झाले. प्रभासने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर ही माहिती दिली. आता त्याचे अकाउंट पूर्ववत करण्यात आले आहे. त्याने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर पोस्ट केले की त्याचे फेसबुक अकाउंट हॅक झाले आहे आणि त्याची टीम त्यावर काम करत आहे. प्रभासच्या फेसबुक अकाउंटवर जवळपास 24 मिलियन फॉलोअर्स आहेत. त्याचे अकाउंट हॅक झाल्याची माहिती देताना प्रभासने इंस्टाग्रामवर लिहिले - सर्वांना नमस्कार! माझे फेसबुक अकाउंट पेज हॅक झाले आहे. माझी टीम त्यावर काम करत आहे. गुरुवारी रात्री प्रभासच्या फेसबुक अकाउंटवरून दोन व्हिडिओ शेअर करण्यात आले. यातील एका व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते – UNLUCKY HUMANS. तर दुसऱ्या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये असे लिहिले आहे- बॉल फेल्स अराउंड द वर्ल्ड! या व्हिडिओंवर सोशल मीडिया यूजर्सनी प्रभासला ट्रोलही केले. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या आदिपुरुष या चित्रपटासाठी प्रभासला ट्रोल करताना एका यूजरने व्हिडिओवर लिहिले - दुर्दैवी आहेत ते लोक ज्यांनी आदिपुरुषला पाहिले. खाते पुनर्संचयित केल्यानंतर या देखील हटविल्या गेल्या आहेत.

अतिजलद स्पर्धा

## ॲरोनियनविरुद्धच्या पराभवानंतर विजयी पुनरागमन

# गुकेश संयुक्त तिसऱ्या स्थानी!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा जगज्जेता दोम्माराजू गुकेशला अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनकडून पहिल्या फेरीत मिळालेल्या पराभवानंतर पुनरागमन करताना ग्रिगोरी ओपेरिन आणि लिएम ले क्वांगविरुद्ध विजय नोंदवला. या कामगिरीमुळे गुकेश ग्रँड बुद्धिबळ दौऱ्यांतर्गत असलेल्या सेंट लुईस जलद (रॅपिड) आणि अतिजलद (ब्लिट्झ) बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी संयुक्तपणे तिसऱ्या स्थानी राहिला.**

### तीन गुणांसह संयुक्त पाचव्या स्थानावर



गुकेशची सुरुवात चांगली राहिली नाही आणि पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत त्याला ॲरोनियनकडून हार पत्करावी लागली. मात्र, यानंतर पुनरागमन करताना त्याने ओपेरिन व लिएम यांना नमवीत संभावित सहापैकी चार गुणांची कमाई केली. पहिल्या फेरीत कॅरो कान डिफेन्सने सुरुवात केल्याचा फटका गुकेशला बसला. गुकेशने दुसऱ्या फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना ओपेरिनला सहज नमविले. अखेरच्या लढतीत त्याने लिएमविरुद्ध काळ्या मोहऱ्यांसह खेळताना गुकेशला पुन्हा अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, गुकेशने त्याच्याविरुद्ध दबाव कायम राखत अखेर विजय नोंदवला.लास वेगासमध्ये नुकत्याच झालेल्या फ्रीस्टाइल बुद्धिबळ स्पर्धेत विजय मिळवणाऱ्या अमेरिकेचा ग्रँडमास्टर ॲरोनियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि फ्रान्सच्या मॅक्सिम-व्हॅचिएर लाग्रेव्हला नमवीत चमक दाखवली. ॲरोनियन सहा गुणांसह शीर्ष स्थानी आहे. तर, फॅबियानो कारूआना दोन विजय आणि एका बरोबरीसह पाच गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. गुकेश व अमेरिकेचा वेस्ली सो संयुक्तपणे तिसऱ्या, लाग्रेव्ह व लीनियर डोमिन्गुएज पेरेज तीन गुणांसह संयुक्त पाचव्या स्थानावर आहे. लिएम व ओपेरिन प्रत्येकी दोन गुणांसह दुसऱ्या स्थानी आहेत. नोदिरबेकच्या खात्यात एक गुण आहे तर, सॅम शँकलँड सर्व लढतीत पराभूत झाल्यानंतर अखेरच्या स्थानी आहे.गुकेशची सुरुवात चांगली राहिली नाही आणि पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत त्याला ॲरोनियनकडून हार पत्करावी लागली. मात्र, यानंतर पुनरागमन करताना त्याने ओपेरिन व लिएम यांना नमवीत संभावित सहापैकी चार गुणांची कमाई केली. पहिल्या फेरीत कॅरो कान डिफेन्सने सुरुवात केल्याचा फटका गुकेशला बसला. गुकेशने दुसऱ्या फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांसह

### ओपेरिनला सहज नमविले

गुकेशची सुरुवात चांगली राहिली नाही आणि पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत त्याला ॲरोनियनकडून हार पत्करावी लागली. मात्र, यानंतर पुनरागमन करताना त्याने ओपेरिन व लिएम यांना नमवीत संभावित सहापैकी चार गुणांची कमाई केली. पहिल्या फेरीत कॅरो कान डिफेन्सने सुरुवात केल्याचा फटका गुकेशला बसला. गुकेशने दुसऱ्या फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना ओपेरिनला सहज नमविले.

खेळताना ओपेरिनला सहज नमविले. अखेरच्या लढतीत त्याने लिएमविरुद्ध काळ्या मोहऱ्यांसह खेळताना गुकेशला पुन्हा अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, गुकेशने त्याच्याविरुद्ध दबाव कायम राखत अखेर विजय नोंदवला.लास वेगासमध्ये नुकत्याच झालेल्या फ्रीस्टाइल बुद्धिबळ स्पर्धेत विजय मिळवणाऱ्या अमेरिकेचा ग्रँडमास्टर ॲरोनियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि फ्रान्सच्या मॅक्सिम-व्हॅचिएर लाग्रेव्हला नमवीत चमक दाखवली. ॲरोनियन सहा गुणांसह शीर्ष स्थानी आहे. तर, फॅबियानो कारूआना दोन विजय आणि एका बरोबरीसह पाच गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. गुकेश व अमेरिकेचा वेस्ली सो संयुक्तपणे तिसऱ्या, लाग्रेव्ह व लीनियर डोमिन्गुएज पेरेज तीन गुणांसह संयुक्त पाचव्या स्थानावर आहे. लिएम व ओपेरिन प्रत्येकी दोन गुणांसह दुसऱ्या स्थानी आहेत. नोदिरबेकच्या खात्यात एक गुण आहे तर, सॅम शँकलँड सर्व लढतीत पराभूत झाल्यानंतर अखेरच्या स्थानी आहे.भारताचा जगज्जेता दोम्माराजू गुकेशला अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनकडून पहिल्या फेरीत मिळालेल्या पराभवानंतर पुनरागमन करताना ग्रिगोरी ओपेरिन आणि लिएम ले क्वांगविरुद्ध विजय नोंदवला. या कामगिरीमुळे गुकेश ग्रँड बुद्धिबळ दौऱ्यांतर्गत असलेल्या सेंट लुईस जलद (रॅपिड) आणि अतिजलद (ब्लिट्झ) बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी संयुक्तपणे तिसऱ्या स्थानी राहिला.

# क्रीडा प्रशासनात पारदर्शकता येईल!

## आयओए' अध्यक्ष पी.टी.उषा यांच्याकडून क्रीडा विधेयकाचे स्वागत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्य असलेल्या पी. टी. उषा यांनी मंगळवारी क्रीडा विधेयकाचे स्वागत केले. क्रीडा विधेयकामुळे क्रीडा विकासाची गती राखण्याचे काम आणि क्रीडा प्रशासनात पारदर्शकता निर्माण होणार असल्याचे मत उषा यांनी मांडले.**



क्रीडा विधेयकावरील राज्यसभेत झालेल्या चर्चेदरम्यान उषा यांनी विधेयकातील राष्ट्रीय क्रीडा मंडळाच्या स्थापनेसह त्यातील तरतुदींचे विशेष कौतुक केले. सरकारकडून कुठलीही मदत घेण्यापूर्वी मंडळाची मान्यता आवश्यक असणार असून, संघटनांची मान्यता ठरविण्याचा अधिकारही मंडळाचा असणार आहे. यामुळे देशातील क्रीडा संघटनांच्या कामकाजात निश्चितपणे पारदर्शकता येण्याचा विश्वासही उषा यांनी व्यक्त केला.क्रीडा परिसंस्थेतील वाद मिटविण्यासाठी क्रीडा न्यायप्राधिकरणाची आणि निवडणुकांवर देखरेख ठेवण्यासाठी क्रीडा निवडणूक समितीची स्थापना हे दोन्ही प्रस्ताव

### स्वच्छ खेळाची एक नवी संस्कृती

भारत ऑलिम्पिक स्पर्धा आयोजनाचे स्वप्न बघत असताना हे विधेयक आले आहे. यामुळे जागतिक क्रीडा क्षेत्रात भारताला वेगळे स्थान मिळेल. योग्य कृतीसाठी हे विधेयक एक स्पष्ट विचार आहे, असेही उषा यांनी नमूद केले. राष्ट्रीय उत्तेजक विरोधी विधेयकही आणल्यामुळे भारत स्वच्छ खेळाची एक नवी संस्कृती आणू शकेल आणि खेळाडूंचा मार्ग स्पष्ट करेल, असेही उषा यांनी यावेळी सांगितले.

महत्त्वाचे असल्याचेही उषा यांनी आपल्या भाषणातून सांगितले.उषा यांनी यावेळी आपल्या १९८४ लॉस एंजलिस ऑलिम्पिकची आठवण सांगितली. "तेव्हा माझे ऑलिम्पिक पदक थोडक्यात हुकले होते. मी खूप निराश होते. पण, त्यातूनही बाहेर पडण्याची जिद्द होती. पण, तेव्हा आमच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी कोणताही व्यापक क्रीडा कायदा भारतात नव्हता. चार दशके उलटून गेल्यानंतरही ही स्थिती बदललेली नव्हती. मात्र, आता विधेयकामुळे खेळाडूंच्या स्वप्नांनाही बळ मिळणार आहे. निश्चितपणे हे भारतीय क्रीडा परिसंस्थेला आवश्यक असलेले हे एक दूरदर्शी विधेयक आहे," असे उषा म्हणाल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
। दि. 13 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



## संजोग वाघेरे हे अजित पवार यांच्या संपर्कात

# वाघेरे कुटुंबीयांचा राष्ट्रवादीशी पुन्हा 'संजोग'!

### राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आंदोलनात पत्नी आणि मुलाचा सक्रिय




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळमधून लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश केलेले माजी महापौर संजोग वाघेरे हे अजित पवार यांच्या संपर्कात असून ते पुन्हा स्वगृही म्हणजे राष्ट्रवादीत परततील अशी चर्चा थंड होत असतानाच आता पुन्हा एकदा या चर्चेने जोर धरला आहे. नुकत्याच राष्ट्रवादी काँग्रेसने डीपी प्लॅन विरोधात पुकारलेल्या आंदोलनामध्ये संजोग वाघेरे यांच्या पत्नी माजी स्थायी समिती अध्यक्ष उषा वाघेरे आणि त्यांचे चिरंजीव ऋषिकेश वाघिरे आंदोलनात सक्रिय सहभागी झालेले पाहायला मिळाले.**

दरम्यान या आंदोलनातील सक्रिय सहभागामुळे वाघिरे कुटुंबीयांचा राष्ट्रवादीशी 'संजोग' पुन्हा पाहायला मिळणार का अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

लोकसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्र मध्ये प्रचंड प्रमाणात महाविकास आघाडीची लाट पाहायला मिळाली. अनेक दिग्गज या लाटेमध्ये स्वार झाले. खासदार होऊन संसदेत बसले. याच लाटेमध्ये स्वार होण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघांमधून माजी महापौर संजोग वाघिरे यांनी पक्ष बदलला. राष्ट्रवादीमध्ये अनेक पदे उपभोगली. घरामध्ये महापौरपदापासून स्थायी समिती पदापर्यंत अनेक पदे वाघिरे कुटुंबीयांना राष्ट्रवादीच्या माध्यमातून मिळाली. मात्र महाविकास आघाडीची सुक्त लाट लक्षात घेत संजोग वाघिरे यांनी या मतदारसंघातून शिवसेनेचे तिकीट मिळवत निवडणुकीच्या मैदानात उडी मारली. मात्र शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विरोधात वाघिरे यांचा टिकाव लागू शकला नाही. मोठा मताधिक्याने त्यांना पराभवाचा सामना स्वीकारावा लागला. या पराभवानंतर विधानसभेमध्ये भाजपा महायुतीला चांगलेच यश मिळाले. शहरातील परिस्थिती लक्षात वाघेरे यांनी अजित पवार यांच्या गाठीभेटी सुरू केल्या यानंतर पुन्हा एकदा त्यांच्या राष्ट्रवादीमध्ये परतण्याबाबत चर्चा सुरू झाल्या.

#### अनेकांच्या भुवया उंचावल्या!

त्यातच गेल्या आठवड्यामध्ये पिंपरी चिंचवड शहराच्या नवीन प्रारूप योजने विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने आंदोलन पुकारले. या आंदोलनामध्ये संजोग वाघिरे यांच्या पत्नी माजी स्थायी समिती अध्यक्ष उषा वाघिरे आणि त्यांचे चिरंजीव ऋषिकेश वाघिरे सक्रिय सहभागी झालेले पाहायला मिळाले. यामुळे अनेकांच्या भुवया पुन्हा एकदा उंचावल्या. आगामी महापालिका निवडणूक कांच्या दृष्टिकोनातून वाघिरे कुटुंबीय पुन्हा एकदा राष्ट्रवादीशी संजोग करून घेणार का अशीही चर्चा यांनी निमित्ताने रंगली आहे.

---

## भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी “दिल्ली पॅटर्न”

### भाजपा आमदार महेश लांडगे यांची मागणी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे आता गंभीर दृष्टीकोनातून पाहण्याची वेळ आली आहे. पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राजधानी नवी दिल्ली रिजनसाठी दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. तसेच, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही सूचना केली आहे. त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख निर्देश पुढीलप्रमाणे आहेत: 1. सर्व भटक्या कुत्र्यांचे तत्काळ रस्त्यावरून हटविण्यात यावे. 2. संबंधित प्राधिकरणांनी ८ आठवड्यांच्या आत आवश्यक ‘डॉग शेल्टर्स’ (निवारे) उभारावेत. 3. पकडलेल्या कुत्र्यांची नोंद व्यवस्थित ठेवावी आणि एकही कुत्रा पुन्हा रस्त्यावर सोडू नये. 4. कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर इत्यादी मोठ्या शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, अनेकदा लहान मुले, वृद्ध नागरिक व सामान्य नागरिक या कुत्र्यांच्या चावण्यामुळे जखमी होत आहेत, तसेच काही ठिकाणी रॅबीजसारख्या आजारामुळे दुर्दैवी मृत्यू घडले आहेत. याबाबत आम्ही विधानसभा अधिवेशनामध्ये सातत्याने राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे.

दरम्यान, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही पत्र दिले असून, सर्वोच्च न्यायालयाने ज्या प्रमाणे नवी दिल्लीमध्ये निर्णय घेतला. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये उपायोजना करण्याबाबत कार्यवाही करावी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिला द्यावा, असे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.



“भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ अस्वच्छतेची नव्हे, तर थेट जनतेच्या आरोग्याशी आणि सुरक्षिततेशी संबंधित गंभीर बाब आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीत दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात आणि पिंपरी-चिंचवडमध्ये तातडीने ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. नागरिकांची सुरक्षा व आरोग्य हीच सर्वोच्च प्राधान्याची जबाबदारी आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदय यांना मागणी केली आहे.त्यावर सकारात्मक कार्यवाही होईल, असा विश्वास आहे.
**—महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

#### ... या उपाययोजना तातडीने राबवण्याची मागणी

1. सर्व जिल्हा आणि महानगरपालिका क्षेत्रांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी एक विशेष मोहीम राबवावी.
2. प्रत्येक शहरात आणि तालुकास्तरावर कुत्र्यांसाठी सुरक्षित निवारे (डॉग शेल्टर्स) उभारण्याचे आदेश द्यावेत.
3. स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.
4. सार्वजनिक ठिकाणी रॅबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवावी.
5. कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांची तक्रार नोंदवण्यासाठी राज्यस्तरीय टोल-फ्री हेल्पलाइन सुरु करावी.
6. सर्व शाळा, अंगणवाड्या, उद्याने, गार्डन्स येथे विशेष निरीक्षण ठेवण्याचे आदेश द्यावेत.
7. या मोहिमेत सहभागी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण व प्रशिक्षण दिले जावे.
8. या अभियानात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले जावेत.
9. भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ स्वच्छतेची किंवा अडचणीची बाब नसून, जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर प्रश्न आहे. दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टीकोनानुसार महाराष्ट्रातही तात्काळ समांतर कारवाई झाली पाहिजे.

# क्रांतीकारक व सैनिकांविषयी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली कृतज्ञता!

## शिक्षण विश्व: क्रांती दिन सप्ताह संत साई हायस्कूलमध्ये उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संत साई हायस्कूल, भोसरी येथे ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट दरम्यान क्रांती दिन सप्ताह मोठ्या उत्साहात आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या वर्षीचा सप्ताह कृतज्ञता वर्ष.म्हणून साजरा होत असल्याने, शाळेने परिचित व अपरिचित क्रांतीकारक आणि सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले.**




कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या प्रसंगी सेवानिवृत्त मिसाईल पायलट आदेश कुमार त्यागी, सेवानिवृत्त सैनिक अधिकारी भाऊ रामचंद्र मोहिते व सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल ओमप्रकाश सर यांच्या हस्ते मशाल पेटवून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पाहुण्यांचे स्वागत आणि ओळख संजना सिंग यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीच्या स्वरूपा गव्हाणे आणि सोफी पोतदार या विद्यार्थिनींनी केले, तर आभार प्रदर्शन नीतिका कोठारी हिने केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी क्रांतीकारक व सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी कविता माहितीपूर्ण नाटिका तसेच ना झुकेगा देश अपना' या देशभक्तिपर गीतावर नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

प्रमुख पाहुणे आदेश त्यागी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना खेळणे, अभ्यास करणे आणि स्वप्न पाहणे या गोष्टींचे महत्व.समजावून सांगितले. तर भाऊ रामचंद्र मोहिते यांनी मुलींनी सैनिकी सेवेत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे यासाठी प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सर्व परिचित व अपरिचित क्रांतीकारक आणि सैनिकांचे स्मरण करत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी शपथ घेतली आणि 'वंदे मातरम्'.घोषणेत कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम शाळेचे विश्वस्त सदस्य पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून अतिक्रमणांवर 'बुलडोझर

## राष्ट्रीय महामार्गालिगतच्या सेवा रस्त्यांवरील 110 अतिक्रमणे हटवली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच समाजातील वास्तवाची जाणीव करून घ्यावी. समाजात खूप सुधारणा झाली पण खरोखर स्त्री पुरुष समानता झाली आहे का ? महिला सुरक्षितता आहे का ? याचा विचार युवा पिढीने केला पाहीजे असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ . वंदना बोकील यांनी व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ड आणि ब क्षेत्रीय कार्यालयांच्या वतीने मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी अतिक्रमण निर्मूलन मोहिम राबवण्यात आली. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने पवना नदी पुलापासून मुळा नदी पुलापर्यंत अंदाजे ७ किलोमीटर लांबीच्या मुख्य महामार्गालगतच्या दोन्ही बाजूंच्या २४ मीटरपर्यंतच्या सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यात आली. यासाठी ११० बांधकामांना नोटीस देऊन कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ड क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, ब क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या कारवाई वेळी कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण), अनधिकृत बांधकाम विभागाचे उपअभियंता, बीट निरीक्षक, विद्युत विभागाचे उपअभियंता, नगररचना विभागाचे सर्वेयर, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ७० जवान, तसेच वाकड व रावेत पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. कारवाईसाठी ८ जेसीबी, २ क्रेन, ३० मजूर, ब्रेकर यांसारखी यंत्रसामग्री वापरण्यात आली. तर ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कारवाई दरम्यान बांधकाम परवानगी विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ५ बीट निरीक्षक, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ५५ जवान, २० पोलीस कर्मचारी व अधिकारी, महापालिकेचे ५ मजूर, १२ खासगी मजूर यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. यासाठी ६ जेसीबी मशीनचा वापर करण्यात आला.

### वाहतूक सुकर व सुरळीत होण्यास मदत..!

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या मोहिमेमुळे मुंबई – बंगळुरू महामार्गालगतचे सेवा रस्ते अतिक्रमणमुक्त होऊन वाहतुकीसाठी सुरक्षित आणि सुकर झाले आहेत. यामुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. तसेच या सेवा रस्त्यांवर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण केल्यास महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



**15k+** Students Placed

**52 LPA** Highest Package

**50,000+** Alumni

**1000+** Empanelled Recruiters

**150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK · wipro · NTT DATA · virtusa · B&R · Emcure · KNORR-BREMSE · NuLife · CitiusTech · SHL · McKinley Rice · bvg · Technouniq · RPG · CONSTROLOGIX · NASSCOM FOUNDATION · INDOVANCE · Tech Mahindra · DataTech Labs · EMERSON · newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**